# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल :dyracademic@unipune.ac.in
दिनांक :१५ मे, २०१५

संदर्भ क्र. :५२४

**परिपत्रक क्र.-८४**

विद्यापीठ परिपत्रक क्र. २७०/२०१३, दि. २३ डिसेंबर, २०१३ नुसार दि. १ जानेवारी, २०१४ पासून पदव्युत्तर शिक्षक मान्यता, एम.फिल. संशोधन मार्गदर्शक व पीएच. डी. मार्गदर्शक यांना विद्यापीठाची मान्यता मिळविण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

प्राप्त आदेशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याचे वेळापत्रक हे खालीलप्रमाणे असणार आहे. या कालावधीमध्येच संबंधितांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी** | **शैक्षणिक वर्ष२०१५–१६चे प्रथम सत्र**<br>दि. १ जुलै, २०१५ ते दि. ३१ ऑगस्ट,२०१५<br>**शैक्षणिक वर्ष२०१५–१६चे द्वितीय सत्र**<br>दि. १ जानेवारी,२०१६ ते दि. २९ फेब्रुवारी, २०१६ | पदव्युत्तर शिक्षक मान्यता, एम.फिल. संशोधन मार्गदर्शक व पीएच. डी. मार्गदर्शक यांसाठीचे (सर्व विद्याशाखांमधून आलेले) अर्ज स्वीकारण्यात येतील. |
| २. | **कार्यवाहीचा कालावधी** | **शैक्षणिक वर्ष२०१५–१६चे प्रथम सत्र**<br>दि. १ सप्टेंबर, २०१५ ते दि. ३१ डिसेंबर,२०१५<br>**शैक्षणिक वर्ष२०१५–१६चे द्वितीय सत्र**<br>दि. १ मार्च, २०१६ ते दि. ३० जून, २०१६ | प्राप्त अर्जांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी संशोधन व मान्यता समिती (R. R. Committee) व विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ (B.U.T.R.) या समित्यांचे सभांचे आयोजन करण्यात येईल. |

शैक्षणिक वर्ष २०१५–१६च्या प्रथम सत्रातील ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जाची 'हार्ड कॉपी' ही दि. १५ सप्टेंबर, २०१५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. तसेच द्वितीय सत्रातील ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जाची हार्ड कॉपी ही दि. १५ मार्च, २०१६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**संचालक**
**(म.वि.वि.मं.)**